PRIYADARSHINI MAHILA MAHAVIDYALAYA, WARDHA

**6.3.3 Professional development /administrative training programs organized by the institution for teaching and non teaching staff**

Five Days National Faculty Development Programme and Future Librarianship (27/04/2020 to 01/05/2020)



**Priyadarshini Mahila Mahavidyalaya Wardha**

Apr 29, 2020 • • View Thread

https://youtu.be/b_ocDxmUIRE



YOUTUBE.COM

**Faculty Development Program & Future Librarianship 3rd Day 29th April 20**

---

**Priyadarshini Mahila Mahavidyalaya Wardha** is with **Pratibha Taksande** and **Rambha Sonaye**.

May 4, 2020 • • View Thread

सकाळ 04/05/2020

वर्धा — वर्धा, सोमवार, ४ मे २०२० — ४

# ह्यूमन लायब्ररी माणसाला वाचण्याची प्रक्रिया

## हर्षद फड : प्रियदर्शिनी महिला महाविद्यालयातील पाचदिवशीय राष्ट्रीय वेबिणार कार्यशाळेचा समारोप

सकाळ वृत्तसेवा

वर्धा, ता. ३ : बऱ्याच देशांमध्ये अशाप्रकारे ह्यूमन लायब्ररी कार्यरत आहेत. ही चळवळ भारतात २०१७ मध्ये सुरू केली. ह्यूमन लायब्ररी ही माणसाला वाचण्याची प्रक्रिया आहे, समाजापासून दूर गेलेल्या व्यक्तीबद्दल जाणून घेण्याचे हे एक चांगले माध्यम आहे. ह्यूमन ग्रंथ वाचताना आपल्या मनातील त्या समाजाबद्दल असलेली भावना निघून जाईल आणि आपण त्यांना समजून प्रवाहात आणून त्यांचा स्वीकार करू. ह्यूमन लायब्ररी ही एकमेकांना समजून घेण्याची प्रक्रिया आहे, असे मत विषयतज्ज्ञ हर्षद फड यांनी व्यक्त केले.

श्री बापूराव देशमुख फाउंडेशन सेवाग्राम संचलित प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय पाच दिवसीय वेबिणार कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या वेबिणारचे अध्यक्ष संस्थेचे संस्थाध्यक्ष शरद देशमुख होते. ही कार्यशाळा प्राचार्या डॉ. रंभा सोनाये यांच्या मार्गदर्शनाखाली व ग्रंथालय विभागप्रमुख डॉ. प्रतिभा गौतम ताकसांडे यांच्या नियोजना खाली २७ एप्रिलपासून सुरू होती. ही विदर्भातील पहिलीच राष्ट्रीय वेबिणार कार्यशाळा असल्याची माहिती महाविद्यालयाने दिली.



वर्धा : ऑनलाइन वेबिणारमध्ये सहभागी प्राध्यापक व शिक्षक.

या वेबिणारचे उद्‌घाटन खासदार डॉ. भालचंद्र मुंगेकर यांच्या हस्ते झाले. गेस्ट लेक्चरसाठी अमृत देशमुख पुणे यांनी मेक इंडिया रीड या विषयावर माहिती दिली. दुसऱ्या दिवशी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे केआरसीचे संचालक डॉ. मोहन खेरडे यांचे बीजभाषण झाले. विषय तज्ज्ञ म्हणून ग्रंथालयशास्त्र विभाग रा.सं. तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या असिस्टंट प्रोफेसर डॉ. मंगला हिरवडे यांनी वाङ्मयचौर्य व भारतामध्ये कॉपीराईटबद्दल विचार मांडले. दुसऱ्या सत्रात जळगाव विद्यापीठ येथील मॅनेजमेंट स्कूलचे प्रो. राम चव्हाण यांनी उत्तम संशोधन लेख कसे लिहावे याबद्दल मार्गदर्शन केले. सत्राचे अध्यक्ष जळगाव विद्यापीठ केआरसीचे संचालक डॉ.टी आर बोरसे यांनी मनोगत व्यक्त केले.

### क्षमतेनुसार राहिल्यास विजय

वेबिणारच्या चौथ्या दिवशी आपल्या बीज भाषणात पुणे विद्यापीठाचे ग्रंथालय शास्त्र विभागप्रमुख डॉ.. राजेंद्र कुंभार यांनी वेबिणारच्या संकल्पनेबद्दल व निवडलेल्या विषयाबद्दल गौरवोद्गार काढले. उद्याच्या स्पर्धेत लायब्ररियन यांनी आपल्याला क्षमतेनुसार राहायला पाहिजे तर त्या स्पर्धेत आपण विजयी होऊ, त्यासाठी तंत्रज्ञान आवश्यक असल्याचे मे म्हणाले.

तिसऱ्या दिवशी अध्यक्ष म्हणून डॉ.बा.आं. म. औरंगाबाद विद्यापीठाचे केआरसी चे संचालक डॉ धर्मराज वीर यांनी बीजभाषण केले. विषय तज्ज्ञ म्हणून लाभलेले सीनियर मॅनेजर खेतान कंपनी मुंबईचे डॉ. प्रल्हाद जाधव यांनी इन्फॉर्मेशन रिट्रीव्हल यावर माहिती दिली. दुसरे विषयतज्ज्ञ गोंडवाना विद्यापीठ केआरसीचे संचालक डॉ. नंदकिशोर मोतेवार यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाने तयार केलेल्या ऑनलाइन कोर्सेस बद्दल सांगितले.

धनवटे कॉलेजच्या ग्रंथपाल डॉ. वैशाली माळोदे वडनेरकर यांनी हाऊ टू यूज एन लिस्ट प्रोग्राम या विषयावर व दुसऱ्या विषयतज्ज्ञ नागपूर विद्यापीठाच्या डॉ.. शालिनी लीहितकर यांनी शिक्षकाच्या कालबद्ध पदोन्नती साठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेगवेगळ्या निकषांबद्दल माहिती दिली. त्यानंतर मच्छोदरी कॉलेज अंबडचे प्राचार्य डॉ. शिवशंकर घुमरे यांनी कॅस, एपीआय व त्यातील महत्त्वाच्या स्टेज सांगितल्या.

शेवटच्या सत्राचे दुसरे विषयतज्ज्ञ चेतन टाकसाळे डायरेक्टर सॉफ्टेक सोल्यूशन्स व सर्विसेस पुणे यांनी इंस्टीट्युशनल रीपॉझिटरी बद्दल माहिती सांगून प्रात्यक्षिकही दाखविले. यानंतर आपल्या मनोगतात डॉ. दीपक कापडे यांनी या वेबीनारचे वैशिष्ट्य सांगितली. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.. मधुकर शेवाळे यांनी उत्कृष्ट आयोजनाबद्दल गौरवोद्गार काढले. प्राचार्य सोनाये यांनी त्यांच्या सर्व स्टाफ व सहभागींचे अभिनंदन केले.

**Priyadarshini Mahila Mahavidyalaya Wardha** is with **Pratibha Taksande** and **Rambha Sonaye**.

Apr 30, 2020 • • View Thread

लोकमत

भालचंद्र मुणगेकर : प्रियदर्शिनी महिला महाविद्यालयात वेबिनार

# ग्रंथालय जनमानसातला महत्त्वाचा घटक

लोकमत न्यूज नेटवर्क

वर्धा : आजच्या परिस्थितीत चालती बोलती ग्रंथालये कशी करता येईल, त्या दृष्टीने प्रयत्न झाले पाहिजेत. एकसंध राष्ट्र म्हणून जात, धर्म बाजूला ठेवून एकत्रित आले पाहिजे. जनमानसातील ग्रंथालय हा अविभाज्य घटक असल्याचे मत माजी राज्यसभा सदस्य तथा मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी व्यक्त केले.

प्रियदर्शनी महिला महाविद्यालयातील ग्रंथालय विभागाच्यावतीने पाच दिवसीय वेबिनार 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम ॲण्ड फ्युचर लॉयब्रियनशीप' यावर आयोजित करण्यात आलेला आहे. याचे सोमवारी ऑनलाईन उद्घाटन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.



ऑनलाईन वेबिनारमध्ये सहभागी डॉ. प्रतिभा ताकसांडे.

प्रा. अमृत देशमुख यांनी मेक इंडिया रिड बुकलेट यावर मार्गदर्शन करताना वाचावे कसे, काय वाचावे, गती काय असावी असे सांगत १३५० पुस्तके वाचल्याचे सांगितले. हातात पुस्तक घेणे म्हणजे वाचन नव्हे. माध्यमाला नाही तर मजकुराला महत्त्व द्या. वाचनाची गती प्रतिमिनीट १२०० शब्द असे म्हणाले.वाचन करताना विचार करु नये, असे सांगत मेक इन इंडिया बिझनेस नाही तर मिशन असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रंभा सोनाये होत्या. आयोजन डॉ. प्रतिभा ताकसांडे यांनी केले. विदर्भातील हा पहिला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगचा प्रयोग ठरला. आभार प्रदर्शन प्रा.डॉ. धनंजय सोनटक्के यांनी केले. राज्यातील १०१ ग्रंथपाल आणि प्राध्यापकांनी यात सहभाग नोंदविला आहे.

Hello Wardha
Page No. 4 Apr 30, 2020
Powered by: erelego.com

"Workshop on work Efficiency" for Non-teaching staff. (20/03/2017).

Internal Quality Assurance Cell

**Workshop on "Work Efficiency"**

**Date 20 March 2017**

Resource Person: Mr. Prabhakar Pusadkar, Nai Talim Samiti, Sevagram

Guest of honour: Shri Vasant Wadibhasme, G. S. Commerce College, Wardha






**Priyadarshini Mahila Mahavidyalaya Wardha**

Mar 22, 2017 • • View Thread

महाविद्यालयातील IQAC च्या वतीने शिक्षकेत्तर कर्मचा-यांकरिता कार्यप्रवणता कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.( ता. २० मार्च)   या कार्यशाळेचे उद्घाटन जी. एस. कॉमर्स कॉलेजचे कार्यालय अधीक्षक मा. वसंत वाडीभस्मे यांनी केले तर नई तालिम सेवाग्रामच्या मा. प्रभाकर  पुसदकर यांनी साधन व्यक्ति म्हणुन मार्गदर्शन केले.याप्रसंगी मंचावर प्राचार्य डॉ रंभा सोनाये, डॉ धनंजय सोनटक्के, दिनेश भगत व मुख्य लिपीक विजय चौधरी उपस्थित होते.




# श्रमातून आनंद घेता यावा : पुसदकर

तभा वृत्तसेवा
वर्धा, २४ मार्च

वेगाने बदलत्या जगात गती हा परवलीचा शब्द झालेला असून त्यातून येणाऱ्या ताणाचा परिणाम कार्यालयीन कामकाजावर होतो. पण आपण बदलत्या काळाची नवी तंत्रे व व्यवस्थापनाची योग्य सवय विकसित केली तर आपल्याला दैनंदिन कामकाजातून ही आनंद घेता येतो. स्वत:करीता वेळेचीही बचत करता येते, असे प्रतिपादन नई तालीम, सेवाग्रामचे प्रभाकर पुसदकर यांनी केले.




मार्गदर्शन करताना प्रभाकर पुसदकर. व्यासपीठावर डॉ. सोनटक्के, प्राचार्य रंभा सोनाये व अन्य मान्यवर

Principal
Priyadarshini Mahila
Mahavidyalaya, WARDHA